Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 09 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०९ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ओडिशामधल्या भुवनेश्वर इथं अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन झालं. जगभरातल्या भारतीय समुदायातल्या नागरीकांना एकमेकांशी जोडण्यासाठी हा मंच संधी उपलब्ध करुन देतो. यंदा या परिषदेत ५० देशांमधल्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला आहे. या परिषदेचा समारोप उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे.

अनिवासी भारतीय दिवस आज साजरा होत असून, "भारतीय समुदायाचं विकसित भारतासाठीचं योगदान" ही या वर्षीची संकल्पना आहे.

****

आंध्रप्रदेशमध्ये तिरुपती इथं झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला, तर ४० जण जखमी झाले. तिरुमला तिरुपती देवस्थान समितीने वैकुंठ एकादशी दर्शनासाठी तिरुपतीमध्ये एक लाख २० हजार टोकन वाटपासाठी ९५ कक्ष सुरु केले आहेत. त्यातल्या रामानयडू शाळेजवळच्या कक्षामध्ये काल ही दुर्घटना घडली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. नायडू आज दुपारी तिरुपतीला भेट देऊन आढावा घेणार आहेत.

****

जम्मू आणि श्रीनगरला जोडणारा रेल्वे मार्ग पूर्ण झाल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. अत्याधुनिक वंदे भारत एक्सप्रेस या नवीन मार्गावर चालेल, प्रवाशांचा प्रवास अनुभव वाढेल, असं अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

****

उच्च शिक्षणातील सकल नोंदणीचं प्रमाण पुढील दहा वर्षात ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची मोठी जबाबदारी शिक्षणक्षेत्रातल्या सर्व घटकांवर मोठी जबाबदारी

असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते काल बोतल होते. या समारंभात दहा विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, तर २२ हजार ५१५ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. मुलींच्या वसतिगृहाचं उद्घाटनही राज्यपालांच्या हस्ते झालं.

****

शासकीय रुग्णालयात रुग्णांसाठी अधिकाधिक दर्जेदार आणि अद्ययावत सेवा देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. औषधं तसंच अन्नपदार्थांमधल्या भेसळीला प्रतिबंध करण्यासाठी काटेकोर उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले. वैद्यकीय शिक्षण, अन्न आणि औषध प्रशासन तसंच सामान्य प्रशासन विभागाच्या पुढील १०० दिवसांच्या आराखड्याचा आढावा घेताना ते काल मुंबईत बोलत होते.

****

सुमारे १० लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन नक्षलवादी महिलांनी काल गडचिरोलीत पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. शामला उर्फ लीला झुरु पुडो, आणि काजल उर्फ तिम्मी मंगरु वड्डे अशी त्यांची नावं आहेत. शामला पुडो ही एटापल्ली तालुक्यातल्या गट्टेपल्ली इथली रहिवासी असून, २००२ मध्ये ती चामोर्शी दलममध्ये सहभागी झाली. तिच्यावर २१ चकमकी, सहा जाळपोळ, आणि इतर १८, अशा एकूण ४५ गुन्ह्यांची नोंद आहे. काजल वड्डे २०१८ पासून भामरागड दलममध्ये कार्यरत होती, तिच्यावर एकूण आठ गुन्ह्यांची नोंद आहे.

****

ऊसतोड कामगारांसाठी कारखाना परिसरात साक्षरता वर्ग सुरू करण्याचे आदेश साखर आयुक्तांनी सर्व साखर कारखान्यांना दिले होते. त्यामुळे राज्यात गाळप हंगाम सुरू केलेल्या ९६ सहकारी आणि ९३ खाजगी अशा १८९ साखर कारखान्यांच्या परिसरात साक्षरता वर्ग सुरू झाले आहेत. यात आत्तापर्यंत ४ लाख ९२हजार निरक्षरांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे.

****

नागपूरमध्ये १२ ते १४ जानेवारी दरम्यान राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. विदर्भ साहित्य संघ, नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग आणि कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या संमेलनाचं उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे.

****

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर मोरकरंजा गावाच्या शिवारात पोलिसांनी सापळा रचून गुजरातमधे दारुची तस्करी करणाऱ्या एका वाहनाला ताब्यात घेऊन, सात लाख ९१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी विसरवाडी पोलिस ठाण्यात संशयित आरोपी प्रविण नथ्थू पाटील याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

धुळे जिल्ह्यातल्या साक्री तालुक्यात म्हसदी इथं पोलिसांनी एका वाहनासह ७७ लाख २० हजार रुपये किंमतीचा बनावट मद्यसाठा जप्त केला. हा मद्यसाठा बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या उद्देशानं म्हसदी गावातल्या जयेश गुंजाळ यानं आणला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार त्यांनी ही कारवाई केली.

****

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत मिश्र दुहेरीत भारताचे ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांच्या जोडीचा पराभव झाला. आज झालेल्या सामन्यात चीन च्या जोडीने त्यांचा १३ – २१, २०–२२ असा पराभव केला.

दरम्यान, या स्पर्धेत काल एच एस प्रणॉय आणि मालविका बनसोड यांनी आपापल्या गटात उप उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. प्रणॉयनं कॅनडाच्या खेळाडुवर तर मालविकानं मलेशियाच्या खेळाडुवर मात केली.

****